## सुशीलकुमार शिंदे

**विद्युत मंत्री**
भारत सरकार
नई दिल्ली 110 001


सत्यमेव जयते



# शुभेच्छा

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील एक धुरंधर व्यक्तिमत्त्व श्री. राम नाईक यांचा अमृतमहोत्सव सोहळा मुंबई येथे संपन्न होत आहे ही घटना आम्हां सर्व त्यांच्या स्नेह्यांना आनंद देणारी आहे.

श्री. राम नाईक यांची व माझी जडणघडण वेगवेगळ्या मुशीतून झालेली आहे. आमच्या विचारधारा भिन्न असल्या तरी जनसेवेचे व देशप्रेमाचे व्रत एकच असल्याने आमचे संबंध आजवर अडचणीचे किंवा द्वेषाचे निर्माण झालेले नाहीत. त्यांनी विधीमंडळात विरोधी पक्षाचे सदस्य म्हणून बजावलेली कामगिरी निश्चितच प्रभावी होती. त्यांच्यातील शिस्त, संवादातील स्पष्टपणा व रोखठोकपणा, काम करण्याची तडफ या गोष्टी मला अत्यंत आवडलेल्या आहेत.

दिल्ली येथे संसदेतही त्यांनी बजावलेली कामगिरी लक्षवेधी ठरलेली आहे. संसदेतील प्रत्येक सदस्याला आपल्या कार्यक्षेत्रात विकासाची कामे करण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून त्यांनी जोरकस प्रयत्न केले होते. देशाच्या रेल्वेमंत्रीपदाचा कार्यभार पेलताना त्यांनी मुंबई शहरातील रेल्वे वाहतुकीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनेही भरपूर प्रयत्न केले होते. मुंबई रेल्वे विकास महामंडळाची स्थापना तसेच महिला स्पेशल सुरू करण्यात त्यांनी मोलाची कामगिरी केली. त्याचप्रमाणे पेट्रोलियम विभागाचा कार्यभार सांभाळताना गॅस ग्राहकांच्या प्रश्नात त्यांनी व्यक्तिशः लक्ष घालून गॅस ग्राहकांसाठी त्यावेळी असलेली प्रतिक्षा यादी कमी करण्यात यश मिळविले.

आपल्या देशाची लोकशाही आता प्रगल्भ झालेली आहे, प्रगतीची घौडदौड सुरु आहे. अनेक भाषा, वेगवेगळे विचार, अनेक चालीरीती असल्या तरी शांतता, सहिष्णुता, प्रेमभाव, चारित्र्यसंपन्नता व प्राचीन परंपरा यामुळे जगाच्या पटलावर आपली प्रभावी प्रतिमा उमटलेली आहे. आपण आपले दृष्टीकोन, मार्ग वेगळे असले तरीही उद्दीष्ट एकच असल्याने एकमेकांबद्दलचा आदर जास्तीत जास्त वाढवून या देशाला समृद्ध बनविणे जरूरीचे आहे अशी सर्वांप्रमाणेच माझीही धारणा आहे.

श्री. राम नाईक यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात आजवर केलेले काम व सध्याही ते करीत असलेले काम हे निश्चितच उत्कृष्ट असल्याने त्याबाबत कौतुक होणे जरूरीचे आहे. त्यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या अमृत महोत्सव सोहळ्यानिमित्त त्यांना त्यांच्या चाहत्यांकडून त्यांच्या आजवरच्या कामाची पावतीच मिळत आहे. यापुढेही त्यांचा प्रवास असाच सुरू रहावा म्हणून त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो हीच सदिच्छा व्यक्त करतो.

(सुशीलकुमार शिंदे)